# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


**स्मरणपत्र :**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/ 1892
दिनांक : 04 MAY 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
**सांगली जिल्हयातील** व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय /
अशासकीय अनुदानित व विना अनुदानित सस्था.
(सांगली जिल्हा).

**विषय :- ३३ कोटी वृक्षलागवड २०१९ बाबत...**

संदर्भ :- १ या कार्यालयाचे पत्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/३३ कोटी वृक्षलागवड/२०१९/१७८४, दि. १५/४/२०१९
२. सदस्य सचिव, जिल्हा वृक्ष लागवड अधिकारी, तथा उपवनसंरक्षक, वन विभाग सांगली यांचे पत्र जा.क्र./योजना/३३ कोटी/२०१८-१९/१०२, दिनांक १८/०४/२०१९.
३. महसूल व वन विभागाचे पत्र क्रमांक : साबवि/-२०१८/प्र.क्र./१४४/फ-११, दि. ०६/०९/२०१८.

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये ३३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रम अंतर्गत सन २०१९ करीता, शासनाने आपल्या तंत्र शिक्षण विभागास सांगली जिल्हयासाठी **एकूण १६०७५** इतकी रोपे लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आलेले असल्याचे, सदस्य सचिव, जिल्हा वृक्ष लागवड अधिकारी तथा उपवनसंरक्षक, वन विभाग सांगली यांनी वरील संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविलेले आहे. त्यास अनुसरुन, या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या सांगली जिल्हयातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संस्थाना, सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे संस्थानिहाय वृक्षलागवडीचे उद्दिष्ट नेमून देण्यात आले असल्याचे या कार्यालयाने वरील संदर्भ क्र. १ अन्वये आपणास यापूर्वीच कळविलेले आहे.

त्यानुसार सदर रोपे लागवडीसाठी आवश्यक खड्डे खोदून त्याचा अहवाल सोबत जोडलेल्या विहित **प्रपत्र-२ मध्ये** भरुन तसेच **खोदलेल्या खड्डयांचे प्रत्येक साईटचे फोटो व १० सेकंदाचा व्हिडिओ** संबंधित कार्यालयाच्या ई-मेल आयडी **dycfsangli@gmail.com** वर तसेच या कार्यालयाच्या ई-मेल आयडी **info.ropune@gmail.com** वर **Soft Copy व PDF मध्ये दिनांक २७/०४/२०१९ पर्यंत न चुकता पाठवावे असेही सर्व संस्थांना कळविण्यात आलेले आहे.**

तथापि ब-याच संस्थांनी अद्यापि याबाबत आवश्यक ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. सबब या पत्राव्दारे आपणास पुन्हा कळविण्यात येते की वृक्षलागड करण्याबाबत आपल्या संस्थेस दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याकरीता वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे **दिनांक ०५/०५/२०१९ पर्यंत कार्यवाही पूर्ण करुन, संबंधित कार्यालयाच्या तसेच या कार्यालयाच्या ई-मेल आयडीवर प्रपत्र-२ मध्ये माहिती पाठवावी..**

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :
१. सदस्य सचिव, जिल्हा वृक्ष लागवड अधिकारी तथा उपवनसंरक्षक, वन विभाग सांगली यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२. या कार्यालयातील प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.